कृपया प्रसिद्धीसाठी.

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. ०१/१२/२०२५

प्रेस नोट
पुणे महानगरपालिका
मिळकतकर अभय योजना २०२५-२६

मिळकतकर थकबाकीवर आकारण्यात आलेल्या शास्ती/दंडाच्या रकमेवर ७५% सूट देण्याची योजना जाहीर करण्यात आलेली आहे. **योजनेमध्ये केलेल्या सुधारणेनुसार, यापूर्वी कोणत्याही अभय योजनेचा ज्या मिळकतधारकांनी लाभ घेतला आहे अशा थकबाकीदारांना देखील या अभय योजनेचा लाभ घेता येणार आहे.**

योजनेचा कालावधी १५ नोव्हेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ असा आहे. **सदर योजना निवासी, बिगर निवासी तसेच ओपन प्लॉट अशा सर्व मिळकतीसाठी लागू असेल.**

योजना कालावधीत संपूर्ण कर (थकबाकीसह) भरणे आवश्यक आहे. महापालिकेची नागरी सुविधा केंद्र, बँक ऑफ महाराष्ट्र, आय.सी.आय.सी.आय. बँक, जनता सहकारी बँक व कॉसमॉस बँक तसेच ऑनलाईन मिळकत कर भरता येईल. पुणे महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालातील नागरी सूविधा केंद्रे शनिवारी व रविवारी तसेच सार्वजनिक सट्टीच्या दिवशी देखील सुरु राहतील.

ऑनलाईन कर भरणा propertytax.punecorportion.org या संकेतस्थळावरून करता येईल.
मिळकतकर भरण्यासाठी धनादेश खालील नावाने काढावा.
कर आकारणी व कर संकलन प्रमुख, पुणे म.न.पा.
THE ASSESSOR & COLLECTOR OF TAXES PMC PUNE.

पुणे शहरातील सर्व थकित मिळकत करदात्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी या अभय योजनेचा लाभ घेऊन मिळकत कराची थकित रक्कम त्वरित भरावी.

नवल किशोर राम
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका